## निवडक



**शापोरा : घरकान्न आमचो मान कार्यक्रमाला उपस्थित महिला, सोबत ॲड. सुहासिनी गोवेकर, पार्वती नागवेंकर व संतोष गोवेकर.**

## शापोरा येथे महिलांचा सन्मान


■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. ११ :** महिलांनी संसाराचा गाडा हाकत असतांना आपल्या आरोग्याची सुद्धा काळजी घ्यावी आठवड्यातील एक दिवस तरी आपल्यासाठी जगावा कारण महिलांचे आरोग्य चांगले असले तरच कुटुंबाचे आरोग्य ठीकठाक राहाते असे हणजुण कायसुव पंचायतीच्या माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्त्या ॲड. सुहासिनी गोवेकर यांनी सांगितले. सामाजिक कार्यकर्ते कपील कोरगांवकर यांच्या पुढाकाराने शापोरात आयोजित घरकान्न आमचो मान या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाला स्थानिक सर्व वयोगटातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी स्थानिक पार्वती नागवेकर तसेच सामाजिक कार्यकर्ते कपील कोरगांवकर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात स्थानिक महिलांनी संध्याकाळी उशिरा पर्यंत पारंपरिक धालो, फुगड्यों तसेच स्थानिक नुत्यांचे कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाला हणजुण कायसुव पंचायत क्षेत्रातील शंभरहून अधिक महिलांचा सहभाग लाभला . यावेळी अनेक ग्रुहीणींचा शाल श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह देऊन कोरगांवकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

---

## गिरी येथे शिवनाथ स्वामींची शुक्रवारी पुण्यतीथी

■ टीम दैनिक हेराल्ड



**म्हापसा, दि. ११ :** गिरी बार्देश येथील श्री शिवनाथ स्वामी महाराज (शिवराम पार्सेकर) यांची ५५ वी पुण्यतिथी शुक्रवार दि. १४ रोजी साजरी करण्यात येणार आहे, त्यानिमित्त सकाळी सहा वाजता यज्ञयाग विधी ८ वाजता कुलस्वामी, १० ते ११ पर्यंत स्वामी पादुका अभिषेक, ११.१५ वाजता आरती दुपारी १.३० वाजता प्रसाद संध्याकाळी ७ वाजता भजनाचा कार्यक्रम तरी भाविकांनी उपस्थित राहावे व तीर्थप्रसाद लाभ घ्यावा असे आवाहन रूद्राजी पासैकर यांनी केले आहे.

---

## मेरशीवाडे भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** हर हर शंकर इमारतीजवळील नवीन ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. १३ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत धोबीघाट, मेरशीवाडे येथील हर हर शंकर इमारतीजवळील भागात वीजपूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे मडगाव येथील जुन्या पॉवर हाऊस ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवारी दि. १३ रोजी सकाळी ९ ते संध्या ६ वाजेपर्यंत हॉस्पिसियो हॉस्पिटल, मोतिडोंगर रस्ता, जुंता क्वार्टर्स आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. तसेच रायतोले डीटीसीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १३ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत रायतोले, भाटी, कुंबोर्डा आणि सँडुएल भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

## बे-व्ह्यू कॉलनी डीटीसीवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** बे-व्ह्यू कॉलनी डीटीसीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १२ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत बे-व्ह्यू आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे आयवांव डीटीसीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवारी दि. १३ सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत आयवांव आणि सभोवतालच्या भागात वीजपुरवठा केला जाणार नाही.

---

## निकृष्ट दर्जाचे गूळ, जिन आणि फायरबॉल व्हिस्की विकल्याबद्दल दंड

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** अन्न आणि औषध प्रशासन संचालनालयाने उत्तर गोवा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी निकृष्ट दर्जाचे गूळ, जिन आणि फायरबॉल व्हिस्कीचे उत्पादन आणि विक्री करणाऱ्या अन्न व्यवसाय चालकांना दंड ठोठावला आहे. परवानगी नसलेल्या, कमी दर्जाच्या गुळाची विक्री केल्याबद्दल मेसर्स राजवीर ट्रेडर्स, श्री सोहनलाल घांची, दुकान क्रमांक २, आनंद विहार, पेडे, म्हापसा, मेसर्स दीपक ट्रेडर्स, श्री दीपक केसरकर, दुकान क्रमांक जी-२२, फेज २, सत्तादार आर्केड, पेडे, म्हापसा आणि मेसर्स आर्यन मिनी सुपरमार्केट, श्री जितेंद्र हलर्णकर, घर क्रमांक ८१५/१६(४), महाखाजन, धारगळ, पेडणे यांना प्रत्येकी ३००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. परवानगी नसलेल्या कृत्रिम रंग (एरिथ्रोसिन) असलेले सब-स्टँडर्ड उदयपूर गुलाब जिन विकल्याबद्दल मेसर्स गॅलेस्टॉर्म डिस्टिलरी प्रायव्हेट लिमिटेड, प्रवीण कुमार अग्रवाल, प्लॉट क्रमांक ६२, पिसुर्ले इंडस्ट्रियल इस्टेट, सत्तरी; मेसर्स सॉकहोम डिस्टिलर्स अँड व्हिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड, श्री. मुकेश जैन, दुकान क्रमांक जी-२ आणि जी-३, ग्राउंड फ्लोअर, जर्नलिस्ट कॉलनी, साई सर्व्हिसच्या मागे, पर्वरी, आणि मेसर्स फेदर वेट वाईन्स, रोहन भारद्वाज, एच. नं. ११४६/बी, बागवाडो, मोरजी, पेडणे यांना प्रत्येकी ५०,००० रुपये दंड ठोठावण्यात आला. त्याचप्रमाणे फायरबॉल सिनामन फ्लेवर्ड व्हिस्की विकल्याबद्दल मायकल जॉन डिसूझा, मेसर्स जॉन डिस्टिलरीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्रमांक

---

# १५२ सागरी कासवांनी घातली साडेपंधरा हजार अंडी

## ७९१ पिल्ले सुखरूप सोडली समुद्रात | कासवांनी विक्रमी संख्येने अंडी घालण्याची नोंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ११ :** मोरजी-तेंबवाडा समुद्रकिनाऱ्यावर २४ डिसेंबर २०२४ ते ११ मार्च २०२५ दरम्यान एकूण १५२ सागरी कासवांनी साडेपंधरा हजारांहून अधिक अंडी घातली असून, यापैकी ७९१ पिल्ले आधीच समुद्रात सोडण्यात आली आहेत. ११ मार्च रोजी आणखी १३० अंड्यांतून पिल्ले बाहेर पडली असून, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ती यशस्वीपणे समुद्रात सोडली.

मोरजी पंचायतीच्या कार्यक्षेत्रात १९९७ पासून वन विभागाच्या माध्यमातून दुर्मिळ सागरी कासव संवर्धन मोहीम यशस्वीपणे राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत हजारो सागरी कासवांनी अंडी घातली असून, त्यातून हजारो पिल्ले नैसर्गिकरित्या समुद्रात सोडण्यात आली आहेत. यावेळी २४ डिसेंबर २०२४ पासून सुरू झालेल्या हंगामात कासवांनी विक्रमी संख्येने अंडी घालण्याची नोंद झाली आहे.

कासव संवर्धनाच्या या मोहिमेची माहिती पर्यटकांपर्यंत योग्य त्या प्रमाणात पोहोचत नसल्याबद्धल मोरजीचे सरपंच पवन मोरजे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, स्थानिक व्यावसायिक मच्छीमार, सामाजिक कार्यकर्ते आणि सरकारच्या सहकार्यामुळे ही मोहीम यशस्वी ठरत असली तरी, अभ्यास केंद्रात माहिती अद्याप अपूर्ण आहे. पर्यटक आणि अभ्यासकांना योग्य माहिती मिळत नाही.

सरपंचांनी वनमंत्री विश्वजित राणे यांना यासंदर्भात निवेदन सादर केले आहे. त्यांनी दररोज किती सागरी कासव किनाऱ्यावर येतात, किती अंडी घातली जातात, आणि किती पिल्ले समुद्रात सोडली जातात याची माहिती केंद्रात उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सरपंचांनी अभ्यास केंद्रात माहिती फलक उभारण्याची आणि आकडेवारी नियमित जाहीर करण्याची मागणी केली आहे.





**मोरजी : सुरक्षित अंड्यांची जागा. दुसऱ्या छायाचित्रात माहिती देताना सरपंच पवन मोरजे.**

या अभ्यास केंद्रावर मागील २५ वर्षांपासून माहिती नियमितरित्या उपलब्ध होत होती. मात्र यंदा माहिती अद्याप उपलब्ध होत नसल्याचे सरपंचांचे म्हणणे आहे. एका वृत्तपत्राने चुकीची माहिती प्रसिद्ध केल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माहिती रोखली असल्याचे सांगण्यात येते. नागरिकांना माहिती मिळवण्यासाठी पणजी येथे जावे लागत आहे.

मोरजी किनाऱ्यावरील अभ्यास केंद्राला भेट देणाऱ्या पर्यटकांना आणि अभ्यासकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. केंद्रात शौचालय, चेंजिंग रूम आणि निवासाची कोणतीही सुविधा नाही. कर्मचारी नियमित सेवा बजावत असले तरी त्यांना आवश्यक सुविधा पुरवण्यात आलेल्या नाहीत.

सरपंच पवन मोरजे यांनी वनमंत्री विश्वजित राणे यांना यासंदर्भात लक्ष घालण्याची मागणी केली आहे. अभ्यास केंद्रासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, तसेच अभ्यासक आणि पर्यटकांना माहिती मिळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

---

# अनुसूचित जमाती राजकीय आरक्षण विधेयक मंजुरीची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** अनुसूचित जमाती (एसटी) समुदायाला गोवा विधानसभेत राजकीय आरक्षण देण्यासाठी संसदेत प्रलंबित असलेले विधेयक लवकरात लवकर मंजूर करावे, अशी मागणी युनायटेड ट्रायबल असोसिएशन अलायन्स (उटा)ने मंगळवारी केली.

केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी ५ ऑगस्ट २०२४ रोजी लोकसभेत अनुसूचित जमातींना आरक्षण देण्यासाठीचे विधेयक सादर केले होते. मात्र, नोव्हेंबरमध्ये चर्चेसाठी आलेले हे विधेयक अद्याप मंजूर झालेले नाही.

यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत युनायटेड ट्रायबल असोसिएशन अलायन्सचे (यूटीएए) अध्यक्ष प्रकाश वेळीप म्हणाले की, हे विधेयक मागील वर्षी ऑगस्टमध्ये मांडण्यात आले होते आणि नोव्हेंबरमध्ये चर्चेसाठी आले होते, पण मंजुरीसाठी प्रलंबित आहे. आता संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे, त्यामुळे हे विधेयक त्वरित मंजूर करून राजकीय आरक्षण देण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी.

वेळीप यांनी नमूद केले की, राज्यातील एक शिष्टमंडळाने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. त्यावेळी विधेयक लवकरात लवकर मंजूर केले जाईल आणि अनुसूचित जमातींना गोवा विधानसभेत आरक्षण मिळेल, असे आश्वासन देण्यात आले होते.

२०२७ मध्ये होणाऱ्या राज्य विधानसभा निवडणुकीपूर्वी अनुसूचित जमातींसाठी किमान चार जागा राखीव ठेवाव्यात, अशी मागणी वेलीप यांनी केली. विविध संघटनांचे वेगवेगळे मत असले तरीही, सर्वांचे अंतिम उद्दिष्ट अनुसूचित जमातींना राजकीय आरक्षण मिळवून देणे हेच आहे, असे ते म्हणाले.

केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी गेल्या वर्षी गोवा विधानसभेत अनुसूचित जमातींसाठी प्रतिनिधित्व निश्चित करण्यासाठी *गोवा पुनर्समायोजन विधेयक, २०२४ सादर केले होते. हे विधेयक जनगणना आयुक्तांना गोव्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या निश्चित किंवा अंदाज घेण्याचा अधिकार देते. तसेच, निवडणूक आयोगाला गोवा विधानसभेत जागांचे पुनर्समायोजन करून अनुसूचित जमातींसाठी जागा राखीव ठेवण्याचा अधिकार देईल.

मार्च २०२४ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली होती. तथापि, अद्याप संसदेत हे विधेयक मंजूर झालेले नाही. त्यामुळे विधेयक त्वरित मंजूर करण्याची मागणी यूटीएएने पुन्हा एकदा जोरदारपणे मांडली आहे.

---

# अमेरिकेतील मोठ्या ड्रग्ज प्रकरणातील मुख्य आरोपीला पंजाब पोलिसांकडून अटक

**चंदिगड, दि. ११ :**

पंजाब पोलिसांनी लुधियाना येथे अमेरिकेतील सर्वात मोठ्या अंमली पदार्थ जप्तीप्रकरणी फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (एफबीआय) ला हवा असलेल्या भारतीय वंशाच्या आंतरराष्ट्रीय ड्रग माफियाला अटक केली आहे. शॉन भिंदर उर्फ शहनाज सिंग असे या आरोपीचे नाव असून याला लुधियानामधून अटक करण्यात आली.

भिंदर २०१४ पासून कॅनडामध्ये वाहतूक व्यवसायाच्या आडून कोलंबियाहून मेक्सिकोमार्गे अमेरिका आणि कॅनडामध्ये ड्रग्ज तस्करीमध्ये गुंतलेला होता. या प्रकरणात एफबीआयने कारवाई केल्यानंतर भिंदरने एजन्सीच्या गुप्तहेरांना चकवा देत भारतात आश्रय घेतला होता. पंजाब पोलिसांनी त्याचा शोध घेऊन लुधियानामधून यशस्वीपणे अटक केली.

२६ फेब्रुवारी रोजी अमेरिकेतील सर्वात मोठ्या अंमली पदार्थ जप्तीप्रकरणात एफबीआयला भिंदरचा शोध होता. या कारवाईत सहा आरोपींना अटक करण्यात आली होती आणि त्यांच्या ताब्यातून ३९१ किलो मेथॅम्फेटामाइन, १०९ किलो कोकेन, चार अत्याधुनिक शस्त्रे आणि वाहने जप्त करण्यात आली होती.

अमृतपाल सिंग उर्फ अमृत उर्फ बाल, अमृतपाल सिंग उर्फ चीमा, तकदीर सिंग उर्फ रोमी, सरबजीत सिंग उर्फ साबी, फर्नांडो वल्लादारेस उर्फ फ्रँको आणि गुरलाल सिंग अशी एफबीआयने अटक केलेल्या इतर सहा आरोपींची नावे आहेत. पंजाब सरकारने २५ फेब्रुवारीपासून सुरू केलेल्या युद्ध नशेविरुद्ध (ड्रग्जविरुद्ध युद्ध) मोहिमेच्या पार्श्वभूमीवर भिंदरची अटक ही मोठी कारवाई मानली जात आहे.


डिसेंबर २०२४ मध्ये दाखल झालेल्या शस्त्रास्त्र कायद्याखाली भिंदर आरोपी होता. तरणतारण पोलिसांनी या प्रकरणात कुख्यात जग्गू भगवानपुरिया आणि अमृतपाल बठ टोळीच्या पाच सदस्यांना अटक केली होती. त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला होता.

पंजाबचे पोलिस महासंचालक (डीजीपी) गौरव यादव यांनी सांगितले की, भिंदरच्या अटकेमुळे आंतरराष्ट्रीय ड्रग्ज नेटवर्कबाबत महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे. पोलिस उपमहानिरीक्षक (फिरोजपूर रेंज) स्वप्न शर्मा आणि वरिष्ठ पोलिस अधीक्षक (एसएसपी) तरणतारन अभिमन्यू राणा यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे.

---

# चोराव-रायबंदर रो-रो फेरी सेवेसाठी आणखी दोन महिने प्रतीक्षा

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ११ :** चोराव-रायबंदर नदी मार्गावरील प्रवाशांना दिलासा देणाऱ्या दोन रो-रो फेरी सेवेसाठी प्रवाशांना आणखी दोन महिने वाट पाहावी लागणार आहे. नदी परिचलन विभागाचे मंत्री सुभाष फळ देसाई यांनी सोमवारी यासंदर्भात माहिती दिली.

मंत्री देसाई म्हणाले की, रॅम्पच्या उशिरा झालेल्या कामामुळे पुढील १५ दिवसांत सरकारला फेरी मिळणार असली तरी प्रत्यक्ष सेवा सुरू होण्यासाठी दोन महिने लागतील. आम्ही दोन रो-रो फेरी सेवा सुरू करत आहोत. या फेरी गोव्यातील कंत्राटदार बांधत आहेत. मात्र, फेरी सुरू करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पूर्ण होणे गरजेचे आहे. पायाभूत सुविधांचे काम सध्या वेगाने सुरू असून सुरुवातीला जागेच्या वादामुळे ते रखडले होते. मात्र, तो प्रश्न सोडवण्यात आला आहे आणि नदीच्या दोन्ही बाजूंनी रॅम्पचे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे दोन महिन्यांत रो-रो फेरीची सेवा सुरू होईल, असे देसाई यांनी स्पष्ट केले.

फेरी सेवेसाठी आधी अनेक वेळा तारीख बदलण्यात आली आहे. यावेळी नवीन लॉन्चिंग तारीख २१ मार्च निश्चित करण्यात आली आहे.

गेल्या महिन्यातनदी परिचलन विभागाचे अधिकारी विक्रम राजेभोसले यांनी सांगितले होते की, नवीन रोल-ऑन रोल-ऑफ (रो-रो) फेरीचे प्रक्षेपण मार्चच्या शेवटच्या आठवड्यात पुन्हा वेळापत्रकात ठेवण्यात आले आहे.

नवीन जहाजांमध्ये प्रोपेलरमध्ये दोरी अडकण्याचा धोका कमी होईल, जो पारंपारिक फेरींसाठी नेहमीच समस्या ठरला आहे. *कोणत्याही बिघाडाच्या परिस्थितीत, प्रोपल्शन सिस्टम डेकच्या खाली हायड्रॉलिक पद्धतीने हलवता येते, त्यामुळे कोरड्या डेकची आवश्यकता भासणार नाही, असे राजेभोसले यांनी स्पष्ट केले.

---

# ५१ हजार शेतकरी पीएम-किसान योजनेपासून वंचित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** गोव्यातील ५१ हजाराहूनअधिक 'भूमिहीन' कृषी कार्डधारक शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळू शकलेला नाही. याचे मुख्य कारण म्हणजे, सरकारी नोंदींनुसार हे शेतकरी शेती जमिनीचे मूळ मालक नसल्याचे आढळले आहे.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, या शेतकऱ्यांची नावे महसूल विभागाच्या फॉर्म १ आणि १६ मध्ये नोंदलेली नाहीत, त्यामुळे ते अधिकृतरित्या जमिनीचे मालक म्हणून मान्य केले गेलेले नाहीत. परिणामी, या योजनेच्या लाभापासून ते वंचित राहिले आहेत.

अधिकृत आकडेवारीनुसार, ५१,८०० कृषी कार्डधारक शेतकऱ्यांपैकी केवळ ६,३५७ शेतकऱ्यांनी फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरू झालेल्या किसान योजनेचा लाभ घेतला आहे. लाभ प्राप्त करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदान वितरित करण्यात आले आहे.

पीएम किसान योजनेच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दरवर्षी ६,००० रुपये थेट तीन समान हप्त्यांमध्ये जमा केले जातात. यामुळे लहान व सीमांत शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळतो. कृषी संचालक संदीप फळ देसाई यांनी सांगितले की, मोठ्या प्रमाणावर कृषी कार्डधारक शेतकऱ्यांची नावे सरकारी जमिनीच्या नोंदींमध्ये नाहीत.

---

# आसगावमधील मेगा प्रकल्पाला स्थानिकांचा विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**आसगाव, दि. ११ :** आसगाव ग्रामस्थांनी आमदार डिलायला लोबो आणि सरपंच हनुमंत नाईक यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जलसंपदा विभाग या अभियंत्यांच्या वादग्रस्त मेगा प्रकल्पाला मंजुरी देण्याच्या निर्णयाला तीव्र विरोध केला आहे

स्थानिकांचा विरोध हा मुख्यत: आलिशान गृहसंकुलाच्या उभारणीसाठी आहे, जे दाट झाडी असलेल्या परिसरात होणार असल्याने पर्यावरणीय धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. विशेषत: गावातील महत्त्वाचा जलकुंभ असलेल्या मुख्य आसगाव नाल्यावर प्रस्तावित कल्व्हर्ट (छोटा पूल) बांधण्याच्या निर्णयाला स्थानिकांकडून विरोध केला आहे.

ग्रामपंचायतीने सुरुवातीला कल्व्हर्टच्या मंजुरीला नकार दिला होता. त्यामुळे प्रकल्प विकासकांनी बार्देश ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसरकडे अपील केले. मात्र, बीडीओने देखील पंचायतीचा निर्णय कायम ठेवला. नंतर हे प्रकरण पंचायत संचालकांसमोर नेण्यात आले, जिथे प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. या निर्णयाला ग्रामपंचायतीने तीव्र आक्षेप घेतला असून, आता हा खटला उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

सरपंच हनुमंत नाईक यांनी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद गावडे यांनी दिलेल्या मंजुरीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. नाईक म्हणाले, गेल्या वर्षी आम्ही मंत्र्यांची भेट घेतली होती. तत्कालीनजलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता नाझरेथ वाझ यांनी पूर्वीच्या सर्व परवानग्या रद्द केल्या होत्या. मात्र, मुख्य रस्त्याची रुंदी फक्त तीन मीटर असतानाही नवीन अभियंत्यांनी कल्व्हर्टसाठी परवानगी दिली आहे.

यावर स्पष्टीकरण देताना मिलिंद गावडे यांनी मंजुरी देण्यात आल्याची पुष्टी केली. मात्र, त्यांनी न्यायालयीन प्रकरण असल्याने मंजुरी देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. गावडे म्हणाले की , न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न केल्यास अवमानाच्या कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

स्थानिकांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, नाल्याचा प्रवाह बदलल्यास पावसाळ्यात पूर येण्याची शक्यता आहे. त्यांनी विभागाला मंजुरीचा पुनर्विचार करून स्थानिकांच्या हिताचा विचार करण्याची मागणी केली.

पीडब्ल्यूडी चे सहाय्यक अभियंता (रस्ते) व्हॅलेंटिनो सिक्वेरा यांनी स्पष्ट केले की, कल्व्हर्टच्या मंजुरीसाठी कोणतीही फाइल त्यांच्या कार्यालयात सादर करण्यात आली नव्हती. त्यांनी योग्य प्रक्रियेशिवाय मंजुरी मिळणे अशक्य असल्याचे सांगितले.

शिवोलीच्या आमदार डिलायला लोबो यांनी स्थानिकांच्या चिंतेला पाठिंबा दिला आणि अभियंत्यांना त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले. लोबो म्हणाल्या, या प्रकरणावर जलसंपदा विभागाचे मंत्री सुभाष शिरोडकर आणि मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्यासोबत तातडीने बैठक घेण्यात येईल. स्थानिकांच्या संतापामुळे प्रकरण आता उच्च न्यायालयात गेले आहे. न्यायालयाच्या निकालानंतरच प्रकल्पाच्या भवितव्यावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

---

# आंबेली ग्रामसभेत विकासकामे आणि कचरा व्यवस्थापनावर चर्चा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११ :** आंबेली ग्रामपंचायतीची ग्रामसभा रविवारी आयोजित करण्यात आली होती. या सभेत विविध विकासात्मक प्रकल्प तसेच कचरा व्यवस्थापनाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. तसेच, २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात आली.

ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच अलेक्झांडर डिसिल्वा होते, तर वेळ्ळीचे आमदार क्रूझ सिल्वा देखील विशेष उपस्थित होते. यावेळी पंचायत कार्यालयाजवळ फुटसल मैदान उभारणीच्या प्रस्तावासह कचरा संकलन व विल्हेवाटीबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना, सरपंच डिसिल्वा यांनी भटक्या जनावरांमुळे ग्रामस्थांना निर्माण झालेल्या अडचणींवर प्रकाश टाकला. तसेच, कचरा व्यवस्थापनासाठी पंचायतीला पूर्वी १.५ लाख रुपयांचे सरकारी अनुदान मिळाले होते, मात्र गेल्या चार वर्षांत कोणतीही आर्थिक मदत न मिळाल्याने कचरा संकलन व विल्हेवाट प्रक्रियेस अडथळे निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

आर्थिक मर्यादा लक्षात घेता, आम्ही कचरा व्यवस्थापनासाठी पर्यायी उपाय शोधत आहोत, असे सरपंचांनी स्पष्ट केले. याशिवाय, आंबेली हे गोव्यातील सर्वात मोठे पाणथळ क्षेत्र असल्याचे सांगत, जलसंपदा विभागाने सिंचन सोयीसाठी संरक्षक भिंत उभारावी आणि तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, योग्य प्रक्रियेद्वारे हे पाणी पिण्यायोग्य बनवता येऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.